MHOS150012332022

## निशाणी क्र २८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी मौजे खासापुरी ता. परंडा येथील सर्वे क्र. ७३/३ मध्ये प्रतिवादी क्र. १ च्या मालकीच्या तीन खोल्या असल्याचे, त्या खोल्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हा कुटुंबासह रहातो. तसेच सर्वे क्र. ७३/३ मधील विहिरीवरून प्रतिवादी क्र. १ ने त्याचे सर्वे क्र. ७३/३ मध्ये पी.व्ही.सी. पाईप लाईन केली असले बाबत व त्या पाईप लाईनचा कॉक प्रतिवादी क्र. १ चे क्षेत्रात काढलेला आहे किंवा कसे याची पहाणी करून त्याचा अहवाल मे. न्यायालयात दाखल करणेसाठी न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांची नेमणुक करावी यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जातील थोडक्यात कथने अशी आहेत की, वादीने प्रतिवादी यांचे विरूध्द निरंतर मनाईचा खोटा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यास लेखी कैफियत दाखल केली असुन प्रतिवादीने वादीचा संपूर्ण दावा नाकारलेला आहे. मौजे खासापुरी ता. परंडा येथील जमीन गट क्र. ७३/२ क्षेत्र ०२ हे १७ आर हे प्रतिवादी क्र. १ यास १९९८ साली तोंडी वाटपामध्ये मिळाले असुन त्याबाबतचा फेरफार क्र. १०८१ झाला आहे. वाटपपत्र दिनांक ०३.०३.१९९८ रोजी झाले होते. तेव्हापासुन आज तागायत सदर क्षेत्रात प्रतिवादी क्र. १ हा मालक व कब्जेवहिवाटदार आहे. त्याच वेळी वादीस सर्वे क्र. ७३/३ मधील क्षेत्र ०१ हे ९० आर वाटुन गेले आहे व त्याबाबत कथन प्रतिवादी क्र. १ ने त्यांचे लेखी कैफियतमध्ये विस्तृतपणे केले आहे. सन २००१ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी वादीस वाटुन दिलेल्या जमीन सर्वे क्र. ७३/३ मध्ये वादीकरीता तीन खोल्या व प्रतिवादी क्र. १ करीता तीन खोल्या सिमेंट, विटामध्ये बांधकाम करून बांधलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी हे आपल्या आपल्या खोल्यामध्ये रहात आहेत. वादी व प्रतिवादी क्र. १ हे अज्ञान असताना जमीन सर्वे

क्र. ७३/३ मध्ये घराशेजारी सन १९८४ साली भूविकास सहकारी बॅकेचे कर्ज काढुन एक विहिर खोदलेली आहे. त्या विहिरीमध्ये वादीचा आर्धा हिस्सा व प्रतिवादी क्र. १ चा आर्धा हिस्सा आहे व त्याप्रमाणे सदरील विहिरीतील पाण्याचा वादी व प्रतिवादी क्र. १ हे उपभोग घेत आहेत. सदरील विहिरीवरून प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या मालकीच्या सर्वे क्र. ७३/२ मधील क्षेत्रात पी.व्ही.सी. पाईप लाईन केली आहे. सदरील पाईप लाईनद्वारे प्रतिवादी क्र. १ हा त्याच्या मालकीच्या जमीनीस हिस्सेवारीनुसार पाणी देत आहे. अशा परिस्थीती असताना वादीच्या नावावर असलेल्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्र. ३ च्या मालकीच्या तीन खोल्या व विहिर स्वत: गिळंकृत करण्यासाठी वादीने खोटा दावा दाखल केला आहे. अशा स्थितीत सर्वे क्र. ७३/३ मध्ये प्रतिवादी क्र. १ च्या मालकीच्या तीन खोल्या आहेत का ? त्या खोल्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हा त्याचे कुटुंबासोबत रहातो का तसेच सर्वे क्र. ७३/३ मधील विहिरीवरून प्रतिवादी क्र. १ ने त्याचे सर्वे क्र. ७३/२ मध्ये पी.व्ही.सी. पाईप लाईन केली आहे की? त्या पाईल लाईनचा कॉक प्रतिवादी क्र. १ च्या क्षेत्रात काढलेला आहे का? या सर्व बाबींसाठी न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. सदरील न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांचे अहवालामुळे वादी व प्रतिवादी मध्ये वादग्रस्त मुदयांचा निपटारा होणार आहे व वादी व प्रतिवादी यांचेतील मतभेद दुर होणार आहेत. प्रस्तुत अर्जाच्या माध्यमातुन प्रतिवादी हे कोणताही पुरावा गोळा करू ईच्छीत नाहीत. ते केवळ दिसत्या परिस्थतीचा अहवाल सादर करावा यासाठी न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) नेमणुक करावी अशी मागणी करीत आहेत. सबब प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा.

३. प्रस्तुत अर्जावर निशाणी क्र. ३१ कडे म्हणणे दाखल करून सक्त हरकत घेतली आहे. वादी यांचे मते प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा कायदेशिर तरतुदी व कायदयाच्या तत्वांच्या विरूध्द आहे. वादी व प्रतिवादी मध्ये १९९८ साली वडिलोपार्जित मिळकतीचे वाटप झाले असुन सर्वे क्र. ७३/३ मधील क्षेत्र

वादी यांना देण्यात आले. तर सर्वे क्र. ७३/२ मधील क्षेत्र हे प्रतिवादी क्र. १ यांना देण्यात आले. सदर बाबत रे.दि.मु. क्र. ८५०/२०१८ मध्ये वादी व प्रतिवादी यांचेमध्ये तडजोडसुध्दा झाली होती. दावा मिळकतीमध्ये पश्चिम बाजुस सहा खोल्या असुन त्या मिळकतीमध्ये विहिर देखील आहे याबाबत वादी प्रतिवादी यांच्यामध्ये कोणताही वाद नाही. प्रतिवादी याचे दाव्यातील विहिर व खोल्या यावर मालकी व ताबा आहे किंवा नाही हे त्यात येणा—या पुराव्यानंतर निश्चित होणार आहे. त्यामुळे न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांची नेमणुक करणे कायदयाच्या तत्वानुसार योग्य होणार नाही. कायदयातील तत्वानुसार पुरावा गोळा करणेसाठी, मालकी ठरविण्यासाठी अथवा ताबा आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांची नियुक्ती करता येणार नाही. या सर्व बाबी उभयपक्षकारांनी पुरावा दिल्यानंतरच ठरविता येणार असल्याने प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा कायदयाने चालणारा नाही.

४. प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांनी अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद करत प्रस्तुत अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी क्र. १ चे पैशात भरून न येणारे नुकसान होणार आहे असे कथन केले आहे.

५. वादी यांचे विद्वान विधाज्ञांनी त्यांचे प्रस्तुत अर्जाच्या म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद करत प्रस्तुत अर्ज हा पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने व दावा मिळकतीमधील घरातील तीन खोल्याचा ताबा स्वत:चा आहे हे दर्शविण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला असल्याने तो कायदयाने चालणारा नाही असे कथन केले आहे. प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांनी मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील Dhondiram Nivrutti Pawar (Since deceased) through L.Rs. Dhanaji Dhondiram Pawar and others Vs. Laxman Khasaba Pawar and others, 2018(2) Mh.L.J. 255 या खटल्यातील निकालाचा संदर्भ देत सांगितले की, न्यायालयीन आयुक्त यांची प्लॉट व प्लॉट मधील स्वतंत्र पाण्याची व्यवस्था याबाबीसाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करणे म्हणजे ती

पुरावा गोळा करण्यासाठीची नियुक्ती ठरते. प्रस्तुत खटल्यात देखील वादी हा दावा मिळकतीमधील घरातील तीन खोल्या हा त्याच्या ताब्यात असल्याचे तसेच विहिरीवरील पाईप लाईन त्याचे शेतात जावुन पाण्याचा कॉक त्याचे शेतात असल्याचे दर्शविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांच्या नियुक्तीची मागणी करीत आहे ती केवळ पुरावा गोळा करण्यासाठीच. सबब प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करावा असे त्यांनी सांगितले. पुढे वादी यांच्या वतीने मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील Dulichand Gunaji Gajbhiye Vs. Shankarla Radhakishan Agarwal, 2018(5) Mh.L.J. 424 मधील न्यायनिवाडयाचा संदर्भ देत सांगितले की, न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्याची मागणी करीत असताना संबंधीत पक्षकार यांनी दावा मिळकतीवर त्यांचा हक्क दर्शविणारा तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात असा कोणताही कागदोपत्री पुरावा दिला नसल्याने प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी कथन करीत असलेले विहिर व सहा खोल्यांचे घर हे सर्वे क्र. ७३/३ मध्ये असल्याचे वादी व प्रतिवादी दोघांनाही मान्य आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात त्यांचे सर्वे क्र. ७२/३ मधील क्षेत्रातील दावा मिळकतीशी अथवा तदंभुत वस्तुंशी प्रतिवादीचा कुठलाही हक्क व संबंध नाही असे कथन केले आहे. प्रतिवादी प्रस्तुत अर्जाच्या माध्यमातुन सर्वे क्र. ७२/३ मध्ये असलेल्या घरातील तीन खोल्यामध्ये स्वत:चा ताबा आहे किंवा कसे ही बाब दर्शविण्यासाठी तसेच सदर गटातील विहिरीवरून त्यांचे क्षेत्रात पाईप लाईन जावुन त्या ठिकाणी पाण्याचा कॉक असल्याचे दर्शविण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करावी अशी विनंती करीत आहेत. यावरून प्रतिवादी दावा मिळकतीमधील तीन खोल्यामध्ये स्वत:चा ताबा आहे किंवा नाही ही बाब तसेच दावा मिळकतीतील विहिरीवरून त्यांचे क्षेत्रात पाईप लाईन जावुन त्या ठिकाणी पाण्याचा कॉक असल्याची बाब न्यायालयीन आयुक्त यांचे अहवालाच्या

माध्यमातुन अभिलेखावर आणु ईच्छीत असल्याचे दिसत आहे. म्हणजेच न्यायालयीन आयुक्त यांचे माध्यमातुन प्रतिवादी त्यांचे बाजुने पुरावा गोळा करत असल्याचे दिसत आहे. सबब मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील Dhondiram Nivrutti Pawar (Since deceased) through L.Rs. Dhanaji Dhondiram Pawar and others Vs. Laxman Khasaba Pawar and others, 2018(2) Mh.L.J. 255 या खटल्यातील निकालानुसार तसेच कायदयातील तरतुदीनुसार पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करता येणार नाही. वादी यांच्या वतीने दाखल केलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील Dulichand Gunaji Gajbhiye Vs. Shankarla Radhakishan Agarwal, 2018(5) Mh.L.J. 424 या खटल्यातील बाबी व प्रस्तुत खटल्यातील बाबी या भिन्न असल्याने तसेच प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्याचे पुष्टयर्थ यापुर्वीच तोंडी पुरावा म्हणुन साक्षीदारांचे शपथपत्र दिले असल्याने प्रस्तुत केस मधील न्यायनिवाडयाचा वादी यांना फायदा होणार नाही.

७. वर नमुद केले प्रमाणे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास न्यायालयीन आयुक्त (Court Commissioner) यांचे माध्यमातुन प्रतिवादी दावा मिळकतीतील खोल्यावर स्वत:चा ताबा असलेबाबतचा पुरावा गोळा करू पहात असल्याचे दिसत असल्याने प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. त्यास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/—

दिनांक:—२३.०२.२०२३

(आय. जी. महादेवकोळी)
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर परंडा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.N.Phurade |
| Name of Court | Shri. I.G.Mahadeokoli, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 23/02/2023 |
| Judgment signed by the P.O. on | 23/02/2023 |
| Judgment/Order uploaded on | 23/02/2023 |